427/CS

दिनांक : ०६.१०.२०२१

**विषय : कोजागिरी (DAC) येथील भोजन व्यवस्थेसाठी सन २०२१-२०२३ या कालावधीसाठी ई निविदा करीता आयोजित निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त..**

कोजागिरी (**DAC**) भोजन व्यवस्था निविदा सन २०२१-२०२३ या कालावधीसाठी निविदापूर्व बैठक दिनांक २७/०९/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता डीएसी क्लासरुम नंबर ०४ येथे आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीसाठी निविदादारांच्या वतीने खालील प्रतिनिधी उपस्थित होते.

1. M/s. Hotel Sahakar, Pune
2. M/s. Super Care Catering Services, Mumbai
3. M/s. Jai Malhar Caterers, Mumbai
4. M/s. Kuber Caterers, Thane
5. M/s. Harvinder Singh Maini Bindras Hospitality Services, Pune
6. M/s. Annapurna Caterers, Aurangabad
7. M/s. Global Hospitality Solution, Pune
8. M/s. MCRPZ, Pune
9. M/s. Bharati Associate, Pune
10. M/s. Saipro Food Pvt. Ltd., Pune
11. M/s. Ranjeet Hospitality Services, Pune
12. M/s. Awwas Food LLP, Pune
13. M/s. Mclean India Ltd., Pune
14. M/s. Ranjeet Services, Pune

बैठकीसाठी यशदातील खालील अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

१. श्री. सतिश तडकसे, वित्तीय सल्लागार
२. श्री. हरिश बोरावके, प्रमुख, प्रापण तथा लेखाधिकारी
३. श्री प्रसाद आचार्य, उपनिबंधक
४. श्री विकास कटकधोंड, सहायक निबंधक
५. श्री. अजय दिवटे, वसतिगृह व्यवस्थापक
६. श्री .मुकुंद वीर, प्रकल्प सहायक (तांत्रिक सहायक)
७. श्री. सचिन रायरीकर, प्राध्यापक, HMCT, Pune ( निमंत्रित )

बैठकीमध्ये खालील मुद्द्यांवर चर्चा होवून पुरवठादारांचे शंका निरसन करण्यात आले.

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | MSME चे प्रमाणपत्र असेल तर EMD exempted बाबत M/s. Global Hospitality Solution चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | याबाबत लिफाफा क्रमांक १ तांत्रिक लिफाफा अनु क्रमांक १२ मध्ये स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| २. | मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच कामगार भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र, राज्य कामगार विमा नोंदणी प्रमाणपत्र व कामगार नोंदणी प्रमाणपत्र याबाबत विचारणा करण्यात आली | ज्या नावाने निविदा भरणार आहे त्या नावाचीच सर्व कादगपत्रे असणे आवश्यक आहे. जरी सुरुवातीला कंपनी एका नावाने असेल आणि कालांतराने त्यात बदल झाल्यास व बदल झालेल्या नावाने निविदा भरणार असल्यास बदल झालेल्या नावाची सर्व सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे तसेच त्याची प्रोसेस चालू असल्यास त्याची सूचना पावती जोडणे आवश्यक आहे.(उदा. सुरुवातीला कंपनी xyz pvt. Ltd. होती, आता ती xyz Ltd. झाली. अशा प्रकरणात सर्व कागदपत्र xyz Ltd. नावाची असणे आवश्यक आहे.) |
| ३. | Price Bid भरणेसाठी वार्षिक प्रशिक्षणार्थीची संख्या कळू शकेल काय याबाबत M/s. Global Hospitality Solution चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | सदरची संख्या कायम सारखीच नसते. काही एक दिवसीय, दोन /तीन /पाच दिवसीय तसेच काही ४५ दिवसांचे प्रशिक्षण कार्यक्रम असतात त्याप्रमाणे प्रशिक्षणार्थींची संख्या कमी/जास्त होऊ शकते, असे सांगण्यात आले. प्रशिक्षणार्थींच्या संखेचा अंदाज करण्यासाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील एकूण प्रशिक्षणार्थी दिवस (Participant days) **४७,१४६** आहे. तसेच डिएसी विभागात एकूण १०० रुम असून कोविड-१९ पूर्वी डबल ऑक्युपन्सी नुसार जास्तीत जास्त २०० प्रशिक्षणार्थींची सोय करण्यात येत होती तथापि महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार ५०% क्षमतेने प्रशिक्षण सुरु ठेवणेस मान्यता असल्याने जास्तीत जास्त १०० प्रशिक्षणार्थींची निवासाची सोय आहे त्यानुसार Price Bid भरणेसाठी अंदाज करु शकता असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| ४. | लिफाफा क्रमांक १ : तांत्रिक लिफाफा **अ.क्र.** १७ **मध्ये** राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेचे किमान पन्नास लाख रुपयांचे Solvency Certificate तसेच अ.क्र. मधील १८ **मधील** राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल्ड बँकेचे किमान एक कोटी रुपयांचे बँक ओव्हरड्राफ्ट सुविधा सुरु असल्याचे प्रमाणपत्र/पत्र. यांची मागणी करण्यात आली आहे, तथापि सध्याच्या कोविडच्या अनुशंगाने व्यवसायाची वाताहात झाली आहे अशा परिस्थितीत Business Servival साठी खूप कठीण झाले आहे, Working Capital असताना Bank Overdraft Facility ची आवश्यकता नाही शिवाय बँक ओव्हर ड्राफ्ट सर्टिफिकेट काढण्यासाठी खर्च परवडणार नाही तरी Solvency Certificate व ओव्हरड्राफ्ट सुविधा या दोन्ही बाबी रद्द करण्यात याव्यात याबाबत याबाबत M/s. Global Hospitality Solution चे प्रतिनिधी तसेच M/s. MCRPZ चे प्रतिनिधी यांचेकडून विनंती करण्यात आली आहे. | लिफाफा क्रमांक **१** : तांत्रिक लिफाफा **अ.क्र. १७ तसेच अ.क्र. १८ हे दोन्ही मुद्दे रद्द करण्यात येत आहे.** |

४२९७

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| ५. | लिफाफा क्रमांक १ : तांत्रिक लिफाफा **अ.क्र. १९ मधील** हेड कूक/कूक/ सहायक कूक यांची संख्या तसेच F&B Manager यांची संख्या यामध्ये त्यांचे हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन पदवी / डिप्लोमा / पीजी डिप्लोमा यासारख्या व्यावसायिक पात्रतेबाबत विचार करुन त्यामध्ये हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन सर्टिफिकेट कोर्सचा देखील अंतर्भाव करावा कारण पदवी/ डिप्लोमा/पीजी डिप्लोमाधारक व्यक्ती फक्त ३ किंवा ५ तारांकित हॉटेल्सना प्राधान्य देतात, असे M/s. Bharati Associate चे प्रतिनिधी व M/s. Global Hospitality Solution चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | हेड कूक/कूक/ सहायक कूक यांची संख्या तसेच F&B Manager यांची संख्या यामध्ये त्यांचे हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन पदवी / डिप्लोमा / पीजी डिप्लोमा यासारख्या व्यावसायिक पात्रतेची व्यक्ती असणे आवश्यक आहे. तसेच हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन MSBTE चा डिप्लोमा कोर्स किमान एक वर्षाचा असणे आवश्यक आहे, असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| ६. | लिफाफा क्रमांक १ : तांत्रिक लिफाफा **अ.क्र. २० मधील** क्लायंटचा आकार आणि गुणवत्ता ज्यांच्यासाठी केटरिंग सेवा पुरवल्या जात आहेत (प्रत्येक क्लायंटचे वार्षिक बिलिंग किमान ६० लाख रुपये असावे) अशा सेवा बिलिंगचा मागील तीन वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षाचा आवश्यक पुरावा द्यावा लागेल. वित्तीय वर्ष सन २०१८-२०१९,२०१९-२०२० किंवा २०२०-२०२१. - यामध्ये प्रत्येक क्लायंटचे बीलींग ६० लाख असणे बाबत विचार करुन ते ५० लाख किंवा त्यापेक्षा कमी करणे तसेच सन २०१७-१८ चा समावेश असणेबाबत विचारणा करण्यात आली. तसेच प्रत्येक क्लायंटचे ऐवजी किमान एका क्लायंटचे बिल असा उल्लेख करणेबाबत M/s. Jai Malhar Caterers चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | लिफाफा क्रमांक १ : तांत्रिक लिफाफा **अ.क्र. २० मधील** क्लायंटचा आकार आणि गुणवत्ता ज्यांच्यासाठी केटरिंग सेवा पुरवल्या जात आहेत (प्रत्येक क्लायंटचे वार्षिक बिलिंग किमान ६० लाख लाख रुपये असावे) अशा सेवा बिलिंगचा मागील तीन वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षाचा आवश्यक पुरावा द्यावा लागेल. वित्तीय वर्ष सन २०१८-२०१९,२०१९-२०२० किंवा २०२०-२०२१ तसेच **सन २०१७-२०१८ चा समावेश करण्यात येत आहे. तसेच बिलिंगची मर्यादा ही ६० लाख वरुन किमान ३० लाख करण्यात येत आहे.** |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="3">पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा</th><th colspan="3">मुद्द्याचे स्पष्टीकरण</th></tr>
<tr><td rowspan="3">7.</td><td rowspan="3">हेड कूक/कूक/ सहायक कूक यांची संख्या -<br>कोणत्याही मान्यताप्राप्त देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन पदवी / डिप्लोमा / पीजी डिप्लोमा तसेच क्युलिनरी स्टडीजबाबतची मान्यताप्राप्त हॉटेल मॅनेजमेंट संस्थेची पदवी यासारख्या व्यावसायिक पात्रतेसह आपल्या रोलवरील हेड कूक/कूक/ सहायक कूक यांची संख्या (सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२०२१ यापैकी कोणत्याही सलग तीन वर्ष) तसेच त्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे जोडणे तसेच त्यांच्या EPF with ECR च्या चलन कॉपीज यांचे पुरावे जोडणे आवश्यक आहे.</td><td>७ ते १५</td><td>०५</td><td rowspan="3">हेड कूक/कूक/ सहायक कूक यांची संख्या -<br>कोणत्याही मान्यताप्राप्त देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन पदवी / डिप्लोमा / पीजी डिप्लोमा तसेच क्युलिनरी स्टडीजबाबतची मान्यताप्राप्त हॉटेल मॅनेजमेंट संस्थेची पदवी यासारख्या व्यावसायिक पात्रतेसह आपल्या रोलवरील हेड कूक/कूक/ सहायक कूक यांची संख्या (सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२०२१ यापैकी कोणत्याही सलग तीन वर्ष) तसेच त्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे जोडणे तसेच त्यांच्या EPF with ECR च्या चलन कॉपीज यांचे पुरावे जोडणे आवश्यक आहे.</td><td>५ ते १०</td><td>०५</td></tr>
<tr><td>१६ ते ३०</td><td>१०</td><td>११ ते २०</td><td>१०</td></tr>
<tr><td>३१ च्या पुढे</td><td>१५</td><td>२१ च्या पुढे</td><td>१५</td></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td></td><td colspan="3">असा बदल करण्यात येत आहे</td></tr>
</table>

| अ.क. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | | | मुद्दयाचे स्पष्टीकरण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 8. | F&B सुपरवायझर/मॅनेजर यांची संख्या -<br>कोणत्याही मान्यताप्राप्त देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन पदवी / डिप्लोमा / पीजी डिप्लोमा यासारख्या व्यावसायिक पात्रतेसह आपल्या रोलवरील F&B सुपरवायझर/मॅनेजर यांची संख्या (सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२०२१ यापैकी कोणत्याही सलग तीन वर्ष) तसेच यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे जोडणे तसेच त्यांचे EPF with ECR (Government link) यांचे पुरावे जोडणे आवश्यक आहे. | ७ ते १५ | ०३ | F&B सुपरवायझर/मॅनेजर यांची संख्या -<br>कोणत्याही मान्यताप्राप्त देशांतर्गत किंवा आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत हॉटेल आणि केटरिंग व्यवस्थापन पदवी / डिप्लोमा / पीजी डिप्लोमा यासारख्या व्यावसायिक पात्रतेसह आपल्या रोलवरील F&B सुपरवायझर/मॅनेजर यांची संख्या (सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२०२१ यापैकी कोणत्याही सलग तीन वर्ष) तसेच यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे जोडणे तसेच त्यांचे EPF with ECR (Government link) यांचे पुरावे जोडणे आवश्यक आहे. | **५ ते १०** | ०३ |
| | | १६ ते ३० | ०७ | | **११ ते २०** | ०७ |
| | | ३१ च्या पुढे | १० | | **२१ च्या पुढे** | १० |
| | | | | असा बदल करण्यात येत आहे | | |

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| 9. | तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) मधील एकूण गुण ७० असणे आवश्यक आहे याबाबत एकूण गुण कमी करुन ते ६० पर्यंत करण्याबाबत M/s. Kuber Caterers चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) मधील एकूण गुण ७० असणे आवश्यक आहे, असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| 10. | कोविड-१९ सारखी परिस्थिती उद्भवल्यास किमान Fixed cost किंवा बीलांची minimum गॅरंटी मिळेल काय याबाबत M/s. Ranjeet Services चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | कोविड-१९ सारखी परिस्थिती उद्भवल्यास किमान Fixed cost किंवा बीलांची minimum गॅरंटी देता येणे शक्य नाही असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| 11. | **लिफाफा क्रमांक २ मधील ब मध्ये दर भरताना प्रति व्यक्ती दिलेली** Quantity **ही मर्यादित स्वपरुपात आहे कि अमर्याद आहे** याबाबत M/s. Ranjeet Services चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | **लिफाफा क्रमांक २ मधील अ-१ मध्ये** Quantity **अमर्याद राहील अ-२ मध्ये अ-१ चे दर सविस्तर प्रमाणात द्यायचे आहे अ-२ ची बेरीज ही अ-१ शी जुळणे अनिवार्य आहे. दर पत्रक ब मधील दर हे विशेष प्रसंगी असल्याने प्रति व्यक्ती दिलेली** Quantity **ही मर्यादित स्वपरुपात आहे**, असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| 12. | तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) मधील अ.क्र. ८ मध्ये क्लायंटचा आकार आणि गुणवत्ता ज्यांच्यासाठी केटरिंग सेवा पुरवल्या जात आहेत (प्रत्येक क्लायंटचे वार्षिक बिलिंग किमान ६० लाख रुपये असावे) असे नमूद केले आहे त्यामध्ये प्रत्येक क्लायंटचे ऐवजी किमान एका क्लायंटचे असे बदल करुन त्याचे प्रमाण ३० लाख पर्यंत आणण्याबाबत विचार करावा असे M/s. MCRPZ चे प्रतिनिधी यांचेकडून विचारणा करण्यात आली. | तांत्रिक अर्हता मुल्यमापन तक्ता (ब) मधील अ.क्र. ८ मध्ये क्लायंटचा आकार आणि गुणवत्ता ज्यांच्यासाठी केटरिंग सेवा पुरवल्या जात आहेत (प्रत्येक क्लायंटचे वार्षिक बिलिंग किमान ६० लाख लाख रुपये असावे) अशा सेवा बिलिंगचा मागील तीन वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षाचा आवश्यक पुरावा द्यावा लागेल. वित्तीय वर्ष सन २०१८-२०१९,२०१९-२०२० किंवा २०२०-२०२१ तसेच **सन २०१७-२०१८ चा समावेश करण्यात येत आहे. तसेच बिलिंगची मर्यादा ही ६० लाख वरुन किमान ३० लाख करण्यात येत आहे.** |
| 13. | QCBS (Quality Cost Based Selection) पध्दतीने निवड करताना H-१ येणाऱ्या निविदाधारकास इतरांचे न्युनतम दर स्विकारणे आहे किंवा कसे याबाबत M/s. Ranjeet Hospitality Services यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | **सर्व उपस्थित प्रतिनिधींना** QCBS (Quality Cost Based Selection) पध्दत समजावून सांगण्यात आली त्यामध्ये तांत्रिक बाबींसाठी ६० व दरांसाठी ४० असे गुणोत्तर प्रमाण असे ६०:४० गुणोत्तर प्रमाण ठरविण्यात आले आहे तसेच दरांच्या ४० गुणोत्तर प्रमाणा मध्ये दरपत्रक अ-१ साठी ९० टक्के व दरपत्रक ब साठी १० असे ९०:१० गुणोत्तर प्रमाण असून QCBS प्रमाणे दिलेल्या सुत्रानुसार जो निविदादार H-१ गुण प्राप्त करणार तो यशस्वी निविदादार ठरेल. इतरांचे दर स्विकारण्याची आवयश्यकता नाही असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. सविस्तर माहितीसाठी पृष्ठ क्र.३७ अट क्र ०१-ब पहावे. |
| 14. | अट क्रमांक ३५ मध्ये नमूद केल्यानुसार कायम /प्रतिनियुक्ती/ करार तत्वावरील अधिकारी / कर्मचारी तसेच वर्ग ४ चे कर्मचारी यांचेसाठी दर हे दरपत्रक "अ2" मध्ये प्राप्त झालेल्या दरांमध्ये ३० टक्के सुट देऊन दर निश्चित करण्यात येईल. याबाबत ती सूट नसावी अथवा त्याचे प्रमाण कमी करावे असे M/s. Ranjeet Hospitality Services तसेच M/s. Saipro Food Pvt. Ltd. यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | **याची** Friquency **जास्त प्रमाणात नसते साधारणपणे दिवसाला अंदाजे ५/१० व्यक्तींची संख्या असू शकते. सबब सदर अटीमध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही.** |

| अ.क्र. | पुरवठादारांनी उपस्थित केलेला मुद्दा | मुद्द्याचे स्पष्टीकरण |
|---|---|---|
| 15. | **(ANNEXURE-'E')** **RAW MATERIAL SPECIFICATIONS TO BE USED FOR COOKING** मधील चिकनचा प्रकार मध्ये बारामती अॅग्रो तसेच सगुणा या ब्रँडचा देखील अंतर्भाव करावा असे M/s. Hotel Sahakar यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | ANNEXURE-'E'- **मधील** चिकनचा प्रकार मध्ये बारामती अॅग्रो यांचे Packed Food चा अंतर्भाव करण्यात येत आहे. असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| 16. | किचन Equipment तसेच Infrastructure जुने झाले असल्याने नवीन बदल करुन मिळतील काय तसेच Equipment चे Maintenance कोण करुन देणार तसेच ते खुप जुने झाल्याने व रिपेअर करण्यायोग्य नसल्यास नवीन खरेदी करुन मिळेल काय याबाबत M/s. Saipro Food Pvt. Ltd यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | किचनमधील **दिलेल्या** Equipment चा Maintenance ठेकेदाराने स्वत: करावयाचा आहे. जर वस्तू रिपेअर करण्यायोग्य नसल्यास तसेच काही Equipment ची मागणी असल्यास त्याची आवश्यकता पाहून नवीन खरेदी करुन देण्यात येईल असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| 17. | (ANNEXURE-'E')<br>RAW MATERIAL SPECIFICATIONS TO BE USED FOR COOKING<br>मधील Bread & Sandwich Bread (White / Brown) मध्ये Britannia/ Modern/Oven fresh यांचा समावेश आहे. परंतू जर एखाद्या निविदादारची स्वत:ची बेकरी असल्यास ते चालेल किंवा कसे याबाबत M/s. Harvinder Singh Maini Bindras Hospitality Services यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | Annexure E मध्ये ब्रँड चा विचार करता स्टँडर्ड Quality Maintain होणार नाही निविदेमध्ये असलेल्या ब्रँडचेच पदार्थ पुरविणे बंधनकारक राहील. असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| 18. | (ANNEXURE-'E')<br>RAW MATERIAL SPECIFICATIONS TO BE USED FOR COOKING मधील Cookies या प्रकारात दिलेल्या ब्रँड व्यतिरिक्त दुसरे ब्रँड चालतील काय याबाबत M/s. Super Care Catering Services यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | Annexure E मध्ये दिलेल्या ब्रँडप्रमाणे वस्तूंचा पुरवठा करणे आवश्यक राहील Cookies या प्रकारात **पुना बेकरी/ न्यू पुना बेकरीचा** समावेश करण्यात येत आहे असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |
| 19. | Price Bid भरताना नियुक्त केलेल्या कामगारांचे वेतन विचारात घेवून दर भरावे लागतात. निविदेतील अट क्रमांक १६ मध्ये नमूद केल्यानुसार नेमलेल्या कामगारांना सध्या अस्तित्वात असलेल्या कामगार किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा योजना, भविष्यनिर्वाह निधी, बोनस अॅक्ट, घरभाडे भत्ता अॅक्ट व वेळोवेळी लागू होणाऱ्या बदलानुसार नियम / तरतूदी नुसार आणि इतर कायदेशीर नियमांचे पालन करुन त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन / मानधन देणे आवश्यक राहील असे नमूद केले आहे तथापि वेतनाच्या Basic दरामध्ये वाढ झाल्यास कामगारांच्या वेतनात वाढ होते व त्यानुसार अनुशंगीक वाढ होवून त्यांच्या वेतनात होणारा फरक (difference) यशदातर्फे reimburse मिळू शकेल काय **तसेच Government of India यांनी वेळोवेळी प्रसिध्दा केलेल्या Price Index चा फायदा आम्हाला मिळेल काय** ? याबाबत M/s. Saipro Food Pvt. Ltd यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | Price Bid **भरताना या सर्व बाबींचा विचार करुनच त्याप्रमाणे** Bid **भरावे, वेगळा फरक देण्यात येणार नाही** असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| 20. | उरलेले अन्न वाया जावू नये म्हणून ते यशदाच्या आवाराबाहेर घेवून जाण्यास परवानगी मिळेल काय याबाबत M/s. Hotel Sahakar यांचे प्रतिनिधी यांनी विचारणा केली. | **डिएसी रिसेप्शन येथून, आलेल्या प्रशिक्षणार्थींची संख्या ठेकेदाराच्या प्रतिनिधीने दररोज घेवून त्याप्रमाणे अंदाज करावा जेणे करुन अन्न कमी पडणार नाही तसेच वाया जाण्याचे प्रमाण कमी होईल. निविदेतील अट क्रमांक १४ नुसार** उरलेले शिळे अन्न/खरकटे ब्लॅक प्लॅस्टिक डिसपोझेबल बॅग मध्ये बंद करुन **महापालिकेच्या नियमानुसार** त्याची विल्हेवाट यशदाच्या आवाराबाहेर करण्याची जबाबरी संपूर्णपणे कंत्राटदाराची राहिल, असे यशदाच्या वतीने सांगण्यात आले. तसेच **उरलेले जास्तीचे अन्न गरीब/ निराधार लोकांसाठी पुरविण्याचे काम रॉबिनहुड आर्मी किंवा त्यासारख्या स्वयंसेवी संस्थेस अन्न मोफत देण्यासाठीची कार्यवाही यशदाच्या मान्यतेने संस्थेच्या आवारा बाहेर नेण्यास हरकत नाही. तथापि त्याचा Commercial Purpose असता कामा नये तथापि संबंधित एजन्सीच्या NGO शी यशदासोबत समन्वय करणे आवश्यक राहील.** |
| 21. | **निविदेतील अट क्रमांक** १२.- दैनंदिन अंतर्गत वापरासाठी यशदा मार्फत भोजनगृहामध्ये एक विस्तारीत दुरध्वनीसंच पुरविण्यात येईल, त्यासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे आकारले जाणार नाही. त्याच प्रमाणे भोजनालयासाठी पाणी आणि वीज हे युनिट प्रमाणे कत्रांटदाराला भरावे लागेल.त्यासाठी स्वतंत्र मीटर लावण्यात येईल. | **भोजनालयासाठी पाणी आणि वीज यशदामार्फत मोफत पुरविण्यात येईल.** |
| 22. | **निविदेतील अट क्रमांक** १५.- भोजनगृहातील वॉश बेसीन, पंखे, खिडक्या, दिवे डायनिंग खुर्च्या व टेबल, फरश्या त्या सभोवतालचा परिसराची स्वच्छता संस्थेकडून ठेवण्यात येईल. त्यासाठी संस्थेने नेमलेल्या गृहपालन सफाई कंत्राटदाराकडील एक सफाई कामगारामार्फत वरील कामे करण्यात येतील, सफाई कामगाराच्या पगारापोटी **रू ३०००/-** एवढ्या रक्कमेची भोजन कंत्राटदाराच्या प्रत्येक महिन्याच्या देयकातून वसूल करण्यात येईल. | भोजनगृहातील वॉश बेसीन, पंखे, खिडक्या, दिवे डायनिंग खुर्च्या व टेबल, फरश्या तसेच डायनिंग हॉल व त्या सभोवतालचा परिसराची स्वच्छता कंत्राटदाराने करावयाची आहे. **भोजनृह साफसफाईसाठी लागणारे Cleaning Material यशदामार्फत पुरविण्यात येईल.** |
| 23. | **निविदेतील अट क्रमांक** २४- स्वयंपाकघर डायनिंग हॉल येथे उंदीर, घुशी, झुरळे , माश्या इ. किटकांचा उपद्रव होणार नाही याची पूर्व दक्षता कंत्राटदाराने घ्यावी. यासाठी संस्थेकडून Pest Control उपाययोजना करण्यात येईल. त्यासाठी रू. १०००/- इतकी रक्कम प्रत्येक महिन्याच्या देयकातून वसूल करण्यात येईल. | स्वयंपाकघर डायनिंग हॉल येथे उंदीर, घुशी, झुरळे , माश्या इ. किटकांचा उपद्रव होणार नाही याची पूर्व दक्षता कंत्राटदाराने घ्यावी. यासाठी संस्थेमार्फत मोफत Pest Control उपाययोजना करण्यात येईल. |

वरील प्रमाणे निविदादारांच्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. तसेच निविदादारांना निविदेतील दर भरणे अधिक सुलभ करण्यासाठी PDF BoQ (Price Bid) मध्ये निविदेचे दर सादर करण्याची सुविधा देण्यात आली आहे. या सोबत प्रणालीची अनिवार्यता लक्षात घेता Excel Sheet BoQ (Price Bid) मध्ये दरपत्रक अ-1, अ-2 व दरपत्रक ब यांचे दर नमुद करण्यात येवुन Excel Sheet BoQ (Price Bid) सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदादारांनी Excel Sheet BoQ (Price Bid) व PDF BoQ (Price Bid) या दोन्हीही BoQ (Price Bid) सादर करणे अनिवार्य आहे. Excel Sheet BoQ (Price Bid) मध्ये नमुद करण्यात आलेल्या दरांच्याआधारे कुठल्याही निविदादारांची निविदा दर अंतीम करण्यात येणार नाही. तुलनात्मक तक्ता (Comparative Statement) तयार करण्यासाठी व निविदा अटी व शर्तीनुसार QCBS पध्दतीने H-1 निविदादार ठरविण्यासाठी दरांचा विचार करताना फक्त PDF BoQ (Price Bid) नमुन्याचाच विचार करण्यात येईल, याचा विचार करून निविदादारांनी दोन्ही BoQ अपलोड करणे आवश्यक असल्याचे उपस्थित निविदादारांना सांगण्यात आले. त्यानंतर उपस्थित निविदादारांचे आभार मानण्यात येवुन बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

4351

अजय दिवटे
(वसतिगृह व्यवस्थापक)

विकास कटकधोंड
(सहायक निबंधक)

प्रसाद आचार्य
(उपनिबंधक)

हरिष बोरावके
(प्रापण प्रमुख तथा लेखाधिकारी)

सतिश तडकसे
(वित्तीय सल्लागार)